## दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर, सांगोला यांचे न्यायालयात

## नियमित दिवाणी मुकदमा नं. १९१/२०१४

## निशाणी ७० लगत आदेश

( रुक्मीणी विरुध्द प्रल्हाद व इतर)

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी १४ यांनी त्यांना कैफियत देण्यास झालेला विलंब माफ होणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, सदर दावा वादीने प्रतिवादी विरुध्द सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामी प्रतिवादी यांना वादीने सज्ञान दर्शविले असून प्रतिवादीचे वय दावा दाखल करतेवेळी २० वर्षे नमुद केले आहे. वास्तविक दावा दाखल करतेवेळी प्रतिवादी क्र. १४ हे अज्ञान होते. वादीने अपाक यांची नेमणूक करुन दावा दाखल करणे आवश्यक होते. प्रतिवादी क्र. ८ हे प्रतिवादी क्र. १४ चे वडील आहेत. प्रतिवादी क्र. १४ यास सज्ञान दाखवल्यामुळे व त्यांचेतर्फे वकीलपत्र दाखल केल्यामुळे प्रतिवादी क्र. १४ यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही व दि. ०९/०६/२०१५ रोजी त्यांचे विरुध्द विना कैफियत चौकशी आदेश करण्यात आला आहे. प्रतिवादी यांना कैफियतदेण्यास ९ वर्षे विलंब झालेला आहे. सदरचा विलंब माफ होणे आवश्यक आहे. सदरचा विलंब माफ न झाल्यास प्रतिवादी यांचे अपरीमित नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी यांनी कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणेत यावा अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी प्रस्तुत अर्जावर त्यांचे म्हणणे दिले आहे व प्रतिवादींचा अर्ज

नाकारला आहे. वादीचे कथन की, अर्जातील मजकुर खोटा आहे. दावा दाखल करतवेळी ७/१२ उतारे काढले असता त्यावर प्रणव राजाराम माने असे नाव नमुद होते.केवळ दाव्याचे काम लांबणीवर टाकण्यासाठी अर्ज दिलेला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करणेत यावा.

४. वादीने सदरचा दावा हा सरस निरस मानाने वाटप होवून मिळणेसाठी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वानुसार दोन्ही पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्याची पुरेपुर संधी देण्यात यावी. जर प्रतिवादी यांच्या लेखी कैफियतीशिवाय प्रकरण चालले तर त्यांच्या हक्कास बाधा पोहचू शकते. याउलट प्रतिवादी यांना लेखी कैफियत दाखल करण्याची संधी दिली तर वादीचे अतोनात नुकसान होणार नाही. वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज प्रतिवादी क्र. १४ यांनी **रु. १००/–** दंड देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी रु. १००/– शासन नावे न्यायालयात जमा करावेत.

३. सदर आदेशाची पुर्तता केलेवर प्रतिवादी यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येतो.

SANJAY MOTIRAM GHUGE
Digitally signed by SANJAY MOTIRAM GHUGE
Date: 2024.11.28 10:44:18 +0530

सांगोला.
दिनांक – २६/११/२०२४.

(श्री. संजय मो. घुगे)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan |
| (b) | Court | : | Shri Sanjay M. Ghuge, Civil Judge, J.D.& J.M.F.C., Sangola |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 26/11/2024 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 27/11/2024 |